**नि. फौ ख. क्र. १४६/ २०२४**

**नि ३२**

**सदर साक्षीदाराची साक्ष व्ही. सी. द्वारे नोंदविण्यापूर्वी आवाज स्पष्टपणे येत असल्याची व चित्रफीत व्यवस्थीत दिसत असल्याबाबतची खात्री केली त्यानंतर साक्षीदाराचा जबाब नोंदविण्यास ०३.१० वा. सुरुवात केली आणि ०४.०५ वा. जबाब नोंदवुन पुर्ण झाला.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ चा पुरावा**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नावः– मकंरद भालचंद्र विध्वंस

वयः– ४३ वर्षे

धंदाः– नोडल ऑफिसर, रिलायन्स जिओ,

राः– कोथरुड. पुणे.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचेमार्फत सुरुः–**

०१. मला सदर प्रकरणात पुरावा देण्याकरिता न्यायालयाचे समन्स प्राप्त झाले. गु. र. नं. २५/२०२३ मध्ये एका मोबाईलचा क्र. ९३२४९९०५२० दि. १८/०८/२०२३ ते २३/०९/२०२३ या कालावधीचे कॉल डिटेल्स रेकॅार्ड, CAF आणि ६५–ब चे प्रमाणपत्र यांची मागणी पोलीस अधिक्षक, अहमदनगर कार्यालयातुन दि. २८/१२/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे झाली होती. मला दाखविण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यास **नि. क्र ३३** देण्यात येत आहे. त्यानुसार मी माझे युजर नेम आणि पासवर्ड वापरुन सदर माहिती मी सर्व्हरवरुन डाऊनलोड केली. त्याची प्रींट आऊट काढुन माझ्या सही आणि शिक्यानिशी पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना पाठविली. सदर माहिती मी माझे कार्यालयाचे पत्र जा. क्र. १३८३९/२०२४ प्रमाणे पाठविले. मला दाखविण्यात आलेले पत्र तेच आहे. आरोपीतर्फे आक्षेप घेण्यात आला की, अर्ज नि २८ मध्ये केवळ ६५–ब प्रमाणपत्र दाखल करण्याची परवानगी मागितली आहे व सदर जावक क्रमांकाचे पत्रा हादोषारोपपत्राचा भाग नाही करिता त्यास निशाणी देता येणार नाही. सरकारी वकिलांतर्फे कथन करण्यात आले की, पोलीस अधिक्षक, अहमदनगर पत्र नि. क्र. ३३ सदरची माहिती मागविली त्यानुसार ती प्राप्त झाली त्याकरिता त्यास निशणी देता येईल.

२. सदर पत्राचे अवलोकन केले असता ते पोलीस अधिक्षक अहमदनगर याचे विनंती नुसर देण्यात आले आहे. त्यामुळे केवळ विनंतीमध्ये सदर पत्र अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मागितली नाही, या तांत्रीक कारणावरुन त्यास निशाणी क्रमांक नाकारता येणार नाही. शिवाय सदर पत्रावर उलटतपासाची संधी असल्यामुळे त्यास आरोपीचा आक्षेप खारीज करुन त्यास **नि.क्र. ३४** देण्यात येत आहे.

३. त्यानंतर मी ६५–ब चे प्रमाणपत्र दिले. त्यावर माझी सही व कंपनीचा शिक्का आहे. त्यास **नि. ३५** देण्यात येत आहे. त्यानंतर मी कस्टमर चा सिस्टीम जनरेटर अर्ज माझ्या सही व कंपनीच्या शिक्यानिशी दाखल केला आहे. सदर क्र. ९३२४९९०५२० हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी मागितलेला कालावधीत आकाश नवनाथ कोतकर याचे नावाने होता. आरोपी तर्फे आक्षेप घेण्यात आला की, अर्ज नि. क्र. २८ मध्ये केवळ ६५–ब प्रमाणपत्र दाखल करण्याची परवानगी मागितली आहे व सदर कस्टमर ॲप्लीकेशन हा दोषारोपपत्राचा भाग नाही. करिता त्यास निशाणी देता येणार नाही. सरकारी वकिलांतर्फे कथन करण्यात आले की, पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी पत्र नि. ३३नुसार सदरची माहिती मागविली. त्यानुसार ती प्राप्त झाली त्याकरिता त्यास निशणी देता येईल.

४. सदर पत्राचे अवलोकन केले असता ते पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे विनंतीनुसार देण्यात आले आहे. त्यामुळे केवळ विनंतीमध्ये सदर पत्र अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मागितली नाही, या तांत्रीक कारणावरुन त्यास निशाणी क्रमांक नाकारता येणार नाही. शिवाय सदर अर्जावर उलटतपासाची संधी असल्यामुळे त्यास आरोपीचा आक्षेप खारीज करुन त्यास **नि.क्र. ३६** देण्यात येत आहे.

५. त्यानंतर मी मागितलेल्या कालावधीचा सदर क्रमांकाचा कॉल डिटेल्स रिपोर्ट दिला. त्यावर माझी सही आणि कंपनीचा शिक्का आहे. आरोपी तर्फे आक्षेप घेण्यात आला की, अर्ज नि २८ मध्ये केवळ ६५–ब प्रमाणपत्र दाखल करण्याची परवानगी मागितली आहे व सदर सीडीआर हा दोषारोपपत्राचा भाग नाही. करिता त्यास निशाणी देता येणार नाही. सरकारी वकिलांतर्फे कथन करण्यात आले की, पोलीस अधिक्षक, अहमदनगर पत्र नि. क्र. ३३ सदरची माहिती मागविली त्यानुसार ती प्राप्त झाली त्याकरिता त्यास निशणी देता येईल.

६. सदर सीडीआरचे अवलोकन केले असता ते पोलीस अधिक्षक अहमदनगर याचे विनंती नुसर देण्यात आले आहे. त्यामुळे केवळ विनंतीमध्ये सदर सीडीआर दाखल करण्याची परवानगी मागितली नाही या तांत्रीक कारणावरुन त्यास निशाणी क्रमांक नाकारता येणार नाही. शिवाय सदर सीडीआरवर उलटतपासाची संधी असल्यामुळे त्यास आरोपीचा आक्षेप खारीज करुन त्यास **नि.क्र. ३७** देण्यात येत आहे.

७. त्यानंतर मागितलेल्या नंबरचे टॉवर लोकेशन ॲड्रेस मी दाखल केले आहे. त्यावर माझी सही व कंपनीचा शिक्का आहे. आरोपीतर्फे आक्षेप घेण्यात आला की, अर्ज नि क्र. २८ मध्ये केवळ ६५–ब प्रमाणपत्र दाखल करण्याची परवानगी मागितली आहे व सदर टॉवर लोकेशन ॲड्रेस हे दोषारोपपत्राचा भाग नाही. करिता त्यास निशाणी देता येणार नाही. सरकारी वकिलांतर्फे कथन करण्यात आले की, पोलीस अहमदनगर पत्र नि. क्र. ३३ सदरची माहिती मागविली. त्यानुसार ती प्राप्त झाली त्याकरिता त्यास निशणी देता येईल.

८. सदर टॉवर लोकेशन ॲड्रेसचे अवलोकन केले असता ते पोलीस अधिक्षक, अहमदनगर याचे विनंती नुसर देण्यात आले आहे. त्यामुळे केवळ विनंतीमध्ये सदर पत्र अभिलेखावर दाखल करण्याची

परवानगी मागितली नाही. या तांत्रीक कारणावरुन त्यास निशाणी क्रमांक नाकारता येणार नाही. शिवाय सदर टॉवर लोकेशन ॲड्रेसवर उलटतपासाची संधी असल्यामुळे त्यास आरोपीचा आक्षेप खारीज करुन त्यास **नि.क्र. ३८** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. डी. गांधी यांचेमार्फत सुरुः-**

९. हे म्हणणे खरे आहे की, इंटरनेट वापरताना प्रत्येक आयपीला आयपी ॲड्रेस असतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक मोबाईल, संगणक, सिस्टीम याला मॅक ॲड्रेस असतो. मोबाईलच्या एका आय पी ॲड्रेसवर हॉटस्पॉटने अनेक मोबाईल कनेक्ट होऊ शकतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक सिस्टीमचा मॅक ॲड्रेस हा स्वतंत्र असतो. एखादया आयपी ॲड्रेसवर नेमके कोणते डिव्हाईस कनेक्टेड होते हे ठामपणे मॅक ॲड्रेसवरुन सांगता येईल का याबाबत मला सांगता येणार नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, जीओचे अप्रुव्हल ॲक्टीव्हेशन ऑफिसर हे अहमदाबाद येथे बसत असतात. हे म्हणणे खरे आहे की, आमचे नोंदणीकृत कार्यालय अहमदाबाद येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की,आमचा जो काही डाटा आहे तो अहमदाबाद येथील कार्यालयात जतन केलेला असतो. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हरवरुन प्रींट काढल्यानंतर त्यावर सर्व्हरचा शेरा असतो. हे म्हणणे खरे आहे की,संगणकामध्ये माहिती भरण्यासंदर्भात माझी वैयक्तीक जबाबदारी नाही. त्यामुळे मला त्याची वैयक्तीक माहिती व ज्ञान नाही. हे म्हणणे खरे आहे की, सीडीआर नि. ३७ वर सही गरजेची नाही असे नमुद केले आहे असे असताना सुध्दा सदर सीडीआरवर न्यायालयात दाखल करायचे असल्यामुळे आणि पुराव्याकामी दाखल करायचे असल्यामुळे मी त्यावर सही आणि शिक्का दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेले सदर कारण हे चुकीचे कारण आहे. सीडीआरवर सही आणि शिक्का देण्याबाबत कंपनीतर्फे कोणताही उपनियम केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेल्या सही शिक्यामध्ये कंपनीचे नाव रिलांयन्स जिओ इन्फो कॉम असे लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पत्र नि. ३३ मध्ये रिलांयन्स जिओ इन्फो कॉम या कंपनीकडुन डाटा मागविण्यात यावा असे नमुद केले नाही.

११. मी जुलै २०१७ पासुन या कंपनीत कार्यरत आहे. साक्षीदारास दि.११/११/२०२३ रोजीचा ई-मेल दाखविण्यात आला. सदर ई-मेल मी पाठविला का हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर ई-मेल सन २०१७ पासुन आजपावेतो मीच हॅण्डल करत आहे. सदर ई-मेल आयडी वरुन जे ईमेल गेले आहेत याबाबत तुम्हाला वैयक्तीक माहिती नाही? साक्षीदार सांगतो, त्यांना ते आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कार्यालयातील मेल, ई-मेल मला माहिती नसल्यामुळे मी अपु-या माहितीवरुन साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.३४ ते ३८ प्रमाणेचे कागदपत्र पोलिसांच्या सांगण्यावरुन चुकीचे दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, भारतीय पुरावा कायदा कलम ६५बी प्रमाणपत्राबाबत मला कायदेशीर आवश्यकता काय आहे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की,नि. क्र. ३६ ते ३८ प्रमाणेचे कागदपत्र हे सिस्टीममध्ये असल्याप्रमाणे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की,आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृती

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 17:45:00 +0530

(एल. एस. पाढेण)

दि. ०९/०३/२०२६ मुख्यन्यायदंडाधिकारी

अहमदनगर अहमदनगर